॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

**(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव )**

'A' Grade
NAAC Re-Accredited
(4 th Cycle)



**परीक्षा व मूल्यमापन मंडळ (गोपनीय (पूर्वार्ध) विभाग)**

जा.क्र.कबचौउमवि/७-फ/हिवाळी परीक्षा-२०२६/२६८२/२०२६ दिनांक : २५.०८.२०२६

प्रति,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत
सर्व महाविद्यालयांचे **मा.प्राचार्य** / मान्यता प्राप्त परिसंस्थांचे **मा.संचालक** यांना.....

**विषय : परीक्षेचे गोपनीय कामकाज हाताळणारे कर्मचारी / शिक्षकांची माहिती सादर करणेबाबत...**

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरून प्राप्त आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील विविध वर्गाच्या / अभ्यासक्रमाच्या **हिवाळी-२०२६ च्या लेखी परीक्षा Backlog सह** विद्यापीठाने निश्चित केलेल्या परीक्षा केंद्रावर Descriptive (दिर्घोत्तरी) पध्दतीने **दि. १६ नोव्हेंबर, २०२६ पासून** आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे.

विद्यापीठाद्वारा घेण्यात येणाऱ्या लेखी परीक्षांच्या कामकाजामधील संवेदनशिलता व गांभीर्य विचारात घेऊन परीक्षा निकोप वातावरणात अत्यंत काळजीपूर्वक व सुरळित पार पाडण्यासाठी Online Question Paper Delivery Management Systems (OQPDMS) या कार्यप्रणालीद्वारे प्रश्नपत्रिका डाऊनलोडींग व प्रिंटींग संबंधित गोपनीय कामकाज हाताळणेसाठी कायमस्वरुपी कार्यरत असलेले शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची नियुक्ती करणे आवश्यक असल्याबाबत **शासनाचे निर्देश** प्राप्त झालेले आहेत.

त्या अनुषंगाने Online Question Paper Delivery Management Systems (OQPDMS) या कार्यप्रणालीची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी आपल्या महाविद्यालयात/परिसंस्थेत कार्यरत असलेले नियमित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची या गोपनीय कामकाजासाठी नियुक्ती करुन संपूर्ण माहिती खालील विहित नमून्यात मा.प्राचार्य/संचालक यांच्या स्वाक्षरीने विद्यापीठाच्या **preexamconfidential@gmail.com** या ई-मेल वर पाठविण्यात यावी व त्याची Hard Copy परीक्षा गोपनीय (पूर्वार्ध) विभागात सादर करण्यात यावी. **तसेच परीक्षेच्या गोपनीय कामकाजात कोणत्याही प्रकारची दिरंगाई अथवा अडचण निर्माण होणार नाही, याची कृपया गांभीर्याने दक्षता घ्यावी. परीक्षा आयोजनाच्या गोपनीय कामकाजात महाविद्यालय/परिसंस्था स्तरावर दिरंगाई अथवा अडचणी निर्माण झाल्यास, त्याची सर्वस्वी जबाबदारी मा.प्राचार्य/संचालक यांची राहील,** याची कृपया नोंद घेवून, परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

| अ. क्र. | मा.प्राचार्य/संचालक यांचे नाव | महाविद्यालय/ परिसंस्थेचे नाव | OQPDMS चे गोपनीय कामकाज हाताळणाऱ्या शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे नाव | भ्रमणध्वनी क्रमांक | ई-मेल आयडी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

आपला विश्वासू,

(प्रा.योगेश ना.पाटील)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीस्तव :**

(१) मा.कुलगुरु महोदय कार्यालय, कबचौउमवि.,जळगाव
(२) मा.प्र-कुलगुरु महोदय कार्यालय, कबचौउमवि.,जळगाव